MHJN100006232026

**निशाणी क्र. १८ खालील आदेश**

(पारित दिनांक – ०८/०५/२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये मूळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदारांनी प्रस्तुत प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. परंतू अर्जदार यांनी अर्ज दाखल करतांना अनावधानाने अर्जदार क्र. ३ हा दत्तक गेलेला असतांना त्यांना अर्जात अर्जदार म्हणून समाविष्ट केलेले आहे. वास्तविक पाहता अर्जदार क्र. ३ दिनकर श्रीनिवासराव जोशी हे राजारामपंत हरीहरराव आकणीकर व मनोरमाबाई राजारामपंत आकणीकर यांना दि. १७/०४/१९८४ साली दत्तक गेलेला असल्याने तो मयत श्रीनिवास जोशी यांचा कायदेशीर वारस होउ शकत नाही. त्यामुळे अज्रदार क्र. ३ यांना प्रस्तुत अर्जातून वगळण्याची तसेच परीच्छेद क्र. ३ मध्ये अर्जदार क्र. १ ते ४ ऐवजी अर्जदार क्र. १ ते ३ हे मुले आहेत, तसेच अर्जदार क्र. ५ व ६ मुली ऐवजी अर्जदार क्र. ४ व ५ मुली आहेत, अशी दुरुस्ती करुन त्या अनुषंगाने अर्जात सुधारणा करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर गैरअर्जदार यांनी लेखी म्हणने सादर करुन तिव्र आक्षेप घेतला व कथन केले की, अर्जदारांनी कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०४.	अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

०५.	अर्ज, म्हणने व मुळ अर्जातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की, सदरचा मूळ अर्ज हा अर्जदारांनी मयत श्रीनिवास जोशी यांचे वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला आहे. सदरील अर्ज दाखल करते वेळी त्यांनी दत्तक गेलेल्या मुलास वारस म्हणून समाविष्ट केलेले होते. आता त्यांनी दत्तक गेलेल्या मुलाला वगळून त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करुन मिळण्याची विनंती केली आहे. त्यामुळे सदरील दुरुस्ती नाकारण्यासारखे कोणतेही ठोस कारण नाही, असे माझे मत झाले आहे. करिता मी पुढील प्रमाणे आदेश पारित करते.

## **आ दे श**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी सदरची दुरुस्ती नियमानुसार विहीत कालावधीत करावी.

३. त्यानंतर अर्जदाराने निशाणी क्रमांक १ ची दुरुस्तप्रत न्यायालयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.08 14:34:52 +0530

ठिकाण– मंठा	(श्रीमती एल.पी.धन्वे)
दिनांक– ०८/०५/२०२६	दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंठा